# अहवाल २०१४-१५

## शिर्के प्रशालेतील १० वी च्या गुणवंतांचा सत्कार संपन्न

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या रा.भा.शिर्के प्रशालेतील १० वी च्या विदयार्थ्यांनी यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत शाळेच्या इतिहासातील निकालाचा उच्चांक गाठला आहे.नुकत्याच जाहीर झालेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेत रा.भा.शिर्के प्रशालेतील २९१ पैकी २९० विदयार्थी उत्तीर्ण झाले. शाळेचा चालू वर्षीचा निकाल ९९.६६ % इतका लागला असून हा आतापर्यतचा सर्वोच्य निकाल आहे दि.२८/६/१४ रोजी इ.९ वी,१०वी च्या विद्यार्थ्या समवेत रंजनमंदिर सभागृहात इ.१० वीच्या गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला

कार्यक्रमाची सुरुवात इशस्तवन व स्वागतगीताने झाली.कार्यक्रमांचे अध्यक्ष व मान्यवर संस्थेचे कार्याध्यक्ष मा.ॲड विलासजी पाटणे, शालेय समितीचे अध्यक्ष ॲड.श्री.विजय साखळकर ,नियामक मंडळाचे सदस्य श्री.हळबे सर,श्री.मनोज पाटणकर,श्री.करमरकर श्री.मंदार सावंतदेसाई यांच्या हस्ते दिप प्रत्वलन झाले.त्यानंतर प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.बाबासाहेब पोवार सर यांनी सर्व मान्यवराचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले व आपल्या प्रास्ताविकात इ.१० वी चा शाळेचा निकाल ९९.६६ % लागला तसेच इतर क्षेत्रात शाळा कशी आघाडीवर आहे,स्कॉलरशिप परीक्षा,कीडाक्षेत्र इत्यादी उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला

त्यानंतर प्रशालेच्या गुणवंत विद्यार्थ्याचा मा.अध्यक्ष श्री.ॲड पाटणे साहेब व इतर मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात आला.प्रशालेत १) उमक प्राची दिलीप ४९१ ९८.२०%२)पाटील धनश्री विजय ४८८ / ९७.६० %३)कालेकर श्रध्दा विनोद ४८४ / ९६.८०% ४)नाचणकर प्रथमेश राजकुमार ४७६ / ९५.२०% त्याचप्रमाणे विविध विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्याचा अनेक देणगीदारानी ठेवलेली बक्षीसे देवून सत्कार करण्यात आला.त्याच प्रमाणे इ.१० वी ला शिकविणा-या सर्व शिक्षकांचे गुलाब पुष्प देवून पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कु.तेजस साखळकर इ.९ वी या विद्यार्थ्याने इंटरनॅशनल गणित ऑलिंपीयाड या परीक्षेत महाराष्ट्र व गोवा राज्यात ५ वा क्रमांक मिळवून ब्रॉंझ मेडल व १००० रु.चा चेक,DVD,प्रमाणपत्र मिळवले त्याचा ही सत्कार अध्यक्षांच्या हस्ते केला.प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री.ठाकूर देसाई यांनी पाठवलेले विद्यार्थ्याचे अभिनंदन पत्र वाचून दाखवले.त्यानंतर प्रशालेत प्रथम आलेली विद्यार्थिनी कु.प्राची उमक हिने आपले मनोगत व्यक्त केले शिक्षकांचे मार्गदर्शन व मेहनत मोलाची असून त यांनी दाखवून दिलेल्या चुकामुळे व सुरुवातीपासून अभ्यास चालू ठेवल्यामुळे यश मिळाले.त्यानंतर श्रध्दा कालेकर या विद्यार्थिनीनेही अभ्यासाचा नियमित पणा व सराव करुन घेतल्यामुळे यश मिळाले असे सांगितले. कु. प्रथमेश नाचणकर यांने ही आपले मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर शालेय समिती प्रमुख ॲड विजयराव साखळकर यानी आपले विचार व्यक्त केले.शाळेचा ९९.६६ %हा निकाल मोठा असून आम्हाला खूप आनंद होत आहे असे सांगितले.२९१ मुले परीक्षेला बसली व २९० मुले पास झाली म्हणजे हा १००% निकाल आहे हे यश विद्यार्थ्याच्या मेहनतीचे फळ आहे असे यश मिळवत रहा असा सर्वाना संदेश दिला.

त्यानंतर या बक्षिस वितरण समारंभाचे अध्यक्ष कार्याध्यक्ष मा.ॲड विलासजी पाटणे यानी आपले मनोगत व्यक्त केले त्यावेळी ते म्हणाले की शिर्के प्रशालेचा १० वी चा निकाल सर्वोत्तम आहे त्यामुळे आम्हाला सर्वाना आनंद होत आहे हे सांगताना अनेक उदाहरणे दिली.राजापूरचे उदा.देवून दादासाहेब म्हावळंणकर लोकसभा सभापती यांचे उदाहरण दिले.परीक्षापेक्षा जगायचे कसे जरा पाहायची गरज आहे.तसेच उच्च ध्येय ठेवा,स्वप्ने पण मोठी ठेवा असा संदेश दिला.अरुअप्पा जोशी अकादमी तुमच्यासाठी आहे.'वाचू आनंदे' हा कार्यक्रम समजून घ्या आणि वाचल्याने वाचाल असा मोठा संदेश दिला.असेच यश मिळवा मोठे व्हा यासाठीच संस्था आहे असे सांगून सर्वाना शुभेच्छा दिल्या.

या कार्यकमासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा.ॲड विलासजी पाटणे, शालेय समिती अध्यक्ष ॲड.श्री.विजय साखळकर,नियामक मंडळाचे सदस्य श्री.हळबे सर,श्री.मनोज पाटणकर,श्री.करमरकर श्री.मंदार

सावंतदेसाई,माजी मुख्याध्यापक श्री.कांबळे सर,श्री.वहाळकर सर,प्रभारी मुख्याध्यापक श्री.पोवार सर,पर्यवेक्षक श्री.पाटील सर,सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमांचे सूत्रसंचलन सौ.साखळकर मॅडम यांनी केले तर आभार श्री.आयरे सर यांनी व्यक्त केले.

## छत्रपती श्री.राजर्षी शाहू महाराज यांची जयंती अहवाल

र.ए.सोसायटीच्या रा.भा.शिर्के प्रशालेत दि. २६-६-२०१४ रोजी रंजनमंदीर सभागृहात ८वी ते ९वी च्या विद्यार्थ्या समवेत छत्रपती श्री.राजर्षी शाहू महाराज यांची जयंती कार्यक्रम साजरा केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेचे मुख्याध्यापक श्री पोवार बी.डी.सर यांनी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.त्यानंतर या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रशालेचे जेष्ठ शिक्षक श्री.माळगे सर यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. त्यानंतर प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.पाटील सी.एस.यांनी प्रास्ताविक केले.त्यावेळी त्यानी छत्रपती श्री.राजर्षी शाहू महाराज हे एक मोठा राजा होऊन गेला त्यांनी समाज सुधारणा व दलितासाठी फार मोठे कार्य केले असे सांगितले

त्यानंतर प्रमुख वक्ते श्री.माळगे सर यांनी आपले विचार मांडले त्यांनी शाहू महाराजांचे संपूर्ण चरित्र व कार्याचा आढावा घेतला. शाहू महाराजांच्या हातात राज्य कारभार आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा काढून तेथील लोकांचे राहणीमान व परिस्थिती जाणून घेतली. त्यावेळी दलित व बहुजन वर्गाची परिस्थिती नाजूक होती. त्यातून बाहेर काढण्यासाठी श्री.शाहू महाराज यांनी दलित लोकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.शिष्यवृत्ती सुरु केली व ५०% राखीव जागा पुढे केल्या.शाळा,कॉलेज व वसतिगृह बांधली.शेतीमध्ये सुधारणा केल्या. औदयोगिकरण झपाटयाने केले. धरणे बांधली.कारखाने काढले. सहकार घेऊन भरीव कामगिरी केली.पतपेढी,बॅका सुरु केल्या.लोहमार्ग टाकला. आंबेडकरांना सहकार्य केले.अनेक गोर-गरीब मुलांना परदेश शिक्षणाची संधी निर्माण केली.सर्व जातीपातीसाठी एकच शाळा,कॉलेज काढले. कला,क्रीडा क्षेत्रात शाहूंचे योगदान मोठे होते असे सांगितले.

त्यानंतर कु.प्राजक्ता वैद्य हया विद्यार्थिनीने आपले भाषण केले.तिनेही त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य सांगितले. नंतर या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.बी.डी.पोवार सर यांनी आपले विचार मांडले . त्यावेळी ते म्हणाले शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य मोलाचे होते.त्यांची फळे आज आपणाला मिळत आहेत.शासनानेही कायदा करुन प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे. इटलीत जाऊन ज्वालामुखी पाहणारा राजा , दुष्काळग्रस्तांना मदत करणारा महाराजा होता. विद्यार्थ्यानी यातून चांगली माहिती घ्यावी व आत्मसात करावी असा संदेश दिला.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर मुख्याध्यापक मा. मुख्याध्यापक श्री.बी.डी.पोवार सर,पर्यवेक्षक श्री.पाटील सर,प्रमुख वक्ते श्री.माळगे सर, श्री.चव्हाण सर,श्री.देवळेकर सर,स्वराज्य सभा प्रमुख सौ.काजरेकर मॅडम ,सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.जाधव मॅडम,सर्व शिक्षक,विद्यार्थीउपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ.जाधव मॅडम व आभार सौ.काजरेकर मॅडम यांनी मानले.

# स्वराज्य सभा निवडणूक अहवाल

# सन २०१४-१५

र.ए.सोसायटीच्या रा.भा.शिर्के प्रशालेत नुकत्याच स्वराज्यसभेच्या निवडणूका पार पडल्या.शनिवार ५ जुलै पर्यत उमेद्वारांनी प्रचार करुन विदयार्थ्यांना मत देण्याचे आवाहन केले.सोमवारी ७ जुलै रोजी सकाळी ८.१५ वाजता मतदानाला सुरुवात झाली प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.पोवार सरांनी सर्व उमेद्वाराना शुभेच्छा दिल्या.**'स्वच्छ शाळा,सुदंर शाळा'**हे आपले यावर्षीचे बोधवाक्य असल्याचे सांगून शाळा स्वच्छ सुदंर ठेवण्याचे काम स्वतःपासून करावे असे नमूद केले.सर्व उमेद्वारांनी मुख्याध्यापकांच्या आहावानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.त्यानंतर उमेद्वारांनी स्वतः मतदान केले व मतदानाची प्रकिया सुरु झाली.दुपारी ३.०० वाजता मतदानाची प्रक्रिया संपली सुमारे ९८% मतदान झाले.लगेचच मतमोजणीला प्रारंभ झाला.सायंकाळी ५.०० वाजता प्रभारी मुख्याध्यापक श्री.पोवार सर व पर्यवेक्षक श्री.पाटील सर यांनी निकाल घोषीत केला.५८५ मते मिळवून(२६७ मतांची आघाडी)कु.वैभवी वैजनाथ पवार विदयार्थिनी प्रतिनिधी म्हणून निवडून आली,तर ६१९ मते (३५ मतांची आघाडी)मिळवून कुमार विनीत विवेकानंद कवळेकर विदयार्थी प्रतिनिधी म्हणून निवडून आला.

फटाके वाजवून विजय साजरा नकरता विजयी विदयार्थ्याचे पुष्पहार घालून ढोलताशाच्या गजरात मुख्याध्यापकानी अभिनंदन केले.हे यावर्षीच्या निवडणूकीचे वैशिष्टय !प्रदूषण,खर्च,कचरा या सर्वाना बाजूला करुन विदयार्थ्यांनी गाण्यांच्या तालावर नृत्य करुन विजयोत्सव साजरा केला.स्वराज्यसभा प्रमुख सौ.कोळपे मॅडम व सौ.कांबळे मॅडम व सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.पवार मॅडम ,श्री.आयरे सर यांनी सर्व सहका-याच्या मदतीने मुख्याध्यापकांच्या व पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूका यशस्वीपणे पार पाडल्या.

# स्वराज्य सभा प्रतिनिधी सभा (२०१४-१५)

दि. १०/७/२०१४

दि.१०/०७/२०१४ रोजी सकाळी ठीक ११.३०स्वराज्यसभेचे वर्ग प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी व विद्यार्थिनी प्रतिनिधी यांची सभा मा.मुख्याध्यापक श्री.पोवार सर,स्वराज्य सभा व सांस्कृतिक विभाग यांच्या परवानगीने घेण्यात आली

या सभेत सर्व प्रथम सौ. एन.व्ही.कोळपे यांनी मा.मुख्याध्यापक श्री.पोवार सर,जेष्ठ शिक्षक शेलार सर  तसेच सांस्कृतिक व स्वराज्य सभा विभागातील सर्व शिक्षकांचे व वर्ग प्रतिनिधी यांचे स्वागत व प्रास्ताविक  केले त्यानंतर वर्ग प्रतिनिधींची ओळख करुन देण्यात आली. नंतर सर्व प्रतिनिधी व दोन्ही जी.एस.यांचा शपथविधी घेण्यात आला

त्यानंतर मा.मुख्याध्यापक श्री.पोवार सर यांनी **.'स्वच्छ शाळा,सुदंर शाळा'**हे आपले यावर्षीचे बोधवाक्य असल्याचे सांगून शाळा स्वच्छ सुदंर ठेवण्याचे काम स्वतःपासून करावे असे नमूद केले. आपल्या शाळेची शिस्त टिकविण्यासाठी वर्गप्रतिनिधींची जबाबदारी याविषयी बहूमोल असे मार्गदर्शन केले. त्यानंतर पुढील सभेत मंत्रिमंडळ स्थापन करावे असे सुचित केले.

श्री.आयरे सर यांनी स्वराज्यसभेअंतर्गत कोणकोणते कार्यक्रम घेण्यात येतात यांचा आढावा प्रतिनिधींसमोर ठेवण्यात आला या सभेसाठी स्वराज्य सभेतील सौ.कांबळे पी.एस.,सौ.कोळपे एन.व्ही.,सौ.पोवार पी.एम.,सौ.काजरेकर व्ही.एस. ,श्री.आयरे सर,श्री.बिरादार सर,श्री.जाधव पी.सी.उपस्थित होते.

विद्यार्थी प्रतिनिधी कु.विनित कवळेकर हयाने सर्वाचे आभार मानले व सभेची सांगता करण्यात आली.

# अहवाल

## रा.भा.शिर्के प्रशालेत 'जागतिक लोकसंख्या विस्फोट इशारा दिन ' समारंभ साजरा

दि.११ जुलै २०१४ **जागतिक लोकसंख्या विस्फोट इशारा दिन** हा कार्यक्रम ,लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम माणसाच्या दैनंदिन जीवनावर कसे करतात या गोष्टी विद्यार्थ्यांना कळाव्यात या हेतूने रंजनमंदिर सभागृहात दुपार सत्र ८ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसमोर साजरा करण्यात करण्यात आला.

सकाळ सत्रात या दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यांत आली.या स्पर्धेसाठी मार्गदर्शन सौ.बागवे मॅडम यांनी केले व प्रत्यक्ष कार्यवाही कला शिक्षक श्री.लिंगायत सरांनी केली.स्पर्धेत प्रथम क्र. कु. नलावडे साईराज प्रदिप , व्दितीय क्र. कु. इंदुलकर सानिका संजय आणि तृतीय क्र. कु. दरडी तन्वी द.दिनेश यांनी प्राप्त केला.

दुपार सत्रात या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शाळेतील सहशिक्षिका सौ.दुदगीकर मॅडम होत्या त्याचे स्वागत व ओळख सौ.पवार पी.एम. यांनी करुन दिली.त्यानंतर सौ दुदगीकर मॅडम यांचे भाषण झाले.त्यावेळी त्यानी लोकसंख्या वाढीचे परीणाम सांगितले व विविध कारणे नमुद केली.अंधश्रध्दा,जन्ममृत्यू दर ,आर्थिक विषमता ,दर १० वर्षानी होणारी जनगणना ,स्त्रियांचे प्रमाण कमी ,लोकसंख्येवर आवर घातला पाहीजे असे विचार मांडले.

नंतर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार बी.डी.यांनी मार्गदर्शन केले.त्यावेळी ते म्हणाले की वाढत्या लोकसंख्येत स्त्रियांचे घटते प्रमाण ही चिंतेची बाब आहे .तसेच लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी सर्वानी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे असे सुचविले.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर मा. मुख्याध्यापक श्री पोवार सर,श्री.देवळेकर सर,श्री.माळगे सर,श्री.चव्हाण सर सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.पवार पी.एम.,स्वराज्य सभा प्रमुख सौ.कांबळे पी.एस. तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर,पर्यवेक्षक श्री.पाटील सर,प्रमुख वक्ते सौ.दुदगीकर मॅडम,सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.पवार पी.एम.,स्वराज्यसभा प्रमुख सौ.कांबळे पी.एस मॅडम सर्व शिक्षक वृंद ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दुपार सत्रात सुत्र संचलन सौ.पवार पी.एम.यांनी केले.आभार प्रदर्शन सौ.कांबळे पी.एस मॅडम यांनी केले.

## रा.भा.शिर्के प्रशालेत गुरुपौर्णिमा समारंभ अहवाल

**दि. १२/७/२०१४**

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या रा.भा.शिर्के प्रशालेत रंजन मंदिर सभागृहात सकाळ सत्र व दुपार सत्रात इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसमवेत गुरुपौर्णिमा हा कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यांत आला.

सकाळसत्रात कार्यक्रमांची सुरुवात 'गुरुने दिला ज्ञान रुपी वसा'या गीताने झाली नंतर गुरुचा महिमा सांगणारे श्लोक कु.प्रज्वल झाडे व रितेश शितप यांनी सादर केले.नंतर राजेशिर्के श्रध्दा या विद्यार्थिनीने गुरुपौर्णिमा यावरती विचार मांडले .श्री.संजय आयरे सर यांनी गीत सादर केले.या कार्यकमांचे नियोजन सादरीकरण इ.७ वी अ च्या मुलांनी केले. नंतर मा. मुख्याध्यापक श्री. पोवार बी.डी.सर यांनी मुलाना शुभेछा दिल्या.

दुपार सत्रात या कार्यक्रमांची सुरुवात इशस्तवन व स्वागतगीताने झाली.त्यानंतर मा. मुख्याध्यापक श्री. बी.डी. पोवार , पर्यवेक्षक श्री.पाटील सी.एस.व सर्व जेष्ठ शिक्षक यांनी सरस्वतीच्या फोटोला पुष्पहार अर्पण केला व दिपप्रज्वलन केले . सर्व शिक्षकांना पुष्पगुच्छ व शुभेच्छा कार्ड देवून सर्वाचे स्वागत विद्यार्थ्यांनी केले. इ. ९ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यानी कार्यक्रम सादर केला

गुरुपौर्णिमा व्यास पौर्णिमा ही विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्वपूर्ण घटक आहे विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य याविषयावर कथा सांगितल्या नंतर कु. मंदार भिडे या विद्यार्थ्याने कृष्णावर आधरीत एक कथा सांगितली.त्यानंतर 'गुरुर ब्रम्हा गुरुर विष्णू गुरुर देवो महेश्वरा या गीतावर आधारीत नृत्य सादर केले.कु.इशानी पाटणकर व इतर सहकारी विद्यार्थ्यांनी अनेक गाणी सादर केली.कु.साध्वी राजवाडे ,प्राजक्ता वैद्य,वैष्णवी भालेकर यांनी गुरुच्या मार्गदर्शना शिवाय काहीच शक्य नाही असे विचार मांडले.

त्यानंतर मा. श्री.मुख्याध्यापक श्री.बा.डी.पोवार . यांनी गुरुशिष्य यावर आधारीत विचार व्यक्त केले.त्यांनी ७ वी व ९ वी च्या मुलांचे कौतुक केले.गुरु व शिष्याचे नाते अत्यंत पवित्र असते कारण यातुन ज्ञानाची देवाण घेवाण सतत सुरु असते.आपला शिष्य आपल्या पेक्षाही मोठा व्हावा म्हणुन गुरु सतत धडपडत असतो.लहान मुल सुध्दा आपला गुरु असू शकतात.त याच्यामध्ये सुध्दा चांगल्यागोष्टी असतात. असा संदेश दिला.

हा कार्यक्रम इ.९ अ च्या वर्गाचे वर्गशिक्षिका सौ.गुरव मॅडम व इ.७वी अ च्या वर्गशिक्षिका सौ.साखळकर मॅडम यांनी मार्गदर्शन केले.माजी विद्यार्थिनी कश्मिरा सावंत हीने स्वताःउपस्थित राहुन गुरु महिमा या विषयावर आपले विचार मांडले.मी या शाळेत घडले असे विचार मांडले.

या कार्यक्रमांचे सूत्रसंचलन कु.प्राजक्ता वैद्य व कु .साध्वी राजवाडे यांनी केले तर आभार कु.तेजस साखळकर यांने मांडून कार्यमांची सांगता केली.

## लोकमान्य टिळक पुण्यतिथी अहवाल

**०१/०८/२०१४**

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची रा.भा.शिर्के प्रशालेत रंजनमंदिर सभागृहात सकाळ सत्र व दुपार सत्र इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासमवेत लोकमान्य टिळक पुण्यतिथी हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

सकाळ सत्रात या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.आनंद शेलार ,विद्यामंदिर,पावस चे शिक्षक लाभले होते.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यानी त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.त्याच्या हस्ते टिळकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.श्री.जाधवसर यांनी त्याचा परीचय करुन दिला.त्यानंतर शाळेचे विद्यार्थी कौशल वराडकर व प्राची किनरे यांनी टिळकांचे कार्य विशद केले.समिक्षा लिंगायत हिने एक गीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.आनंद शेलार यानी आपले विचार व्यक्त केले,भारतीय असंतोषाचे जनक तसेच देशाला स्वांतत्र्य मिळवुन देण्यात मोलाचा वाटा ,संपूर्ण आयुष्य देशासाठी वेधले ,सामाजिक सुधारणा ,राजकीय सुधारणा वाद ,केशरी- मराठा वृतपत्राचे कार्य अशी अनेक उदाहरणे त्यांनी दिली.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यानी टिळकांच्या देश सेवेच्या महान कार्याचा आढावा घेतला.ग्रंथाचे उदाहरण तसेच गणेश उत्सव हा कार्यक्रम सुरु केला व लोकांची जागृती घडवून आणली हे सांगितले.

दुपार सत्रात या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून स.रा.देसाई अध्यापक महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री.बर्वे सर लाभले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यानी त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.पाहुण्यांच्या हस्ते टिळकांच्याप्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.नंतर कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.सी.एस.पाटील सर यांनी केले त्यावेळी त्यांनी थोर व्यक्तीची जयंती,पुण्यतिथी का करावी याचे विवेचन केले व टिळकांचे कार्य खुप मोठे आहे असे सांगितले.

नंतर प्रतिवर्षाप्रमाणे प्रत्येक वर्गाच्या वर्गप्रतिनिधीनी स्वताः तयार केलेले पुष्पहार लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेला अर्पण केले,नंतर स्काऊट गाईड,एम.सी.सी.,एन.सी .सी.च्या पथकानी पुष्पहार अर्पण केले.नंतर विद्यार्थ्याची भाषणे झाली इ.९ वी ड मधील विद्यार्थी कु.शिरगावकर याने इंग्रजीत टिळकांच्या जीवनावर विचार मांडले,नंतर प्राजक्ता वैद्य व साध्वी राजवाडे यांनी टिळकांचे बालपण ,देशसेवा यावर विचार मांडले.

प्रमुख वक्ते श्री.बर्वे सर यांनी टिळकांचे बालपण ,बुध्दीमत्ता,हुशारपणा,स्पष्टपणा कसा होता ते अनेक उदाहरणे देऊन सांगितले राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा ,संस्था काढल्या,देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले ,अनेक वेळा तुरुंगवास भोगला,शिवजयंती कार्यक्रम राबवला ,केसरी-मराठा वृत्तपत्र सुरु केले इत्यादी मोलाचे मार्गदर्शन केले.

यानंतर कार्यक्रमांचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यांनी आपले विचार व्यक्त केले त्यावेळी त्यानी आजचा हा दिवस अत्यंत महत्वाचा म्हणजे लो.टिळक पुण्यतिथि,आण्णाभाऊ साठे जयंती व मुख्याध्यापक म्हणून आजच्या चांगल्या दिवशी नेमणूकीचे संस्थेने दिलेले पत्र होय.त्यांनी भाषण केलेल्या विद्यार्थ्याचे कौतुक केले.लो.टिळकांचे कार्य किती महान होते त्याचे एक उदाहरण मंडालेच्या तुरुगांत असताना सुकलेल्या फुलांचे उदाहरण देवून केले तशी चैतन्य शक्ती आपल्या जवळ हवी,त्यांचे राष्ट्रीय सभेचे कार्य,शैक्षणीक राजकीय गुण,देशाला घडवीण्याचे महान कार्य केले.त्याच्यातील अनेक गुण मुलांनी घ्यावेत असा संदेश दिला.

या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे श्री.प्रा.बर्वे सर,मुख्याध्यापक श्री.पोवार सर,उपमुख्याध्यापक सौ.भिडे मॅडम,पर्यवेक्षक श्री.पाटील सर,श्री.देवळेकर सर,स्वराज्य सभा प्रमुख सौ.कांबळे मॅडम,सौ.जाधव मॅडम,जी.एस.कुमार विनीत कवळेकर,कुमारी वैभवी पवार,सर्व शिक्षक वृंद,सेवक वर्ग विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमांचे सुत्रसंचलन सौ.जाधव मॅडम व श्री.संजय आयरे सर यांनी केले, आभार प्रदर्शन सौ.कांबळे मॅडम व श्री.जाधव सर यांनी केले.

## रक्षाबंधन व संस्कृत दिन अहवाल

रा.भा.शिर्के प्रशालेत रंजनमंदिर सभागृहात सकाळसत्र व दुपार सत्र इ.५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासमवेत रक्षाबंधन व संस्कृत दिन हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

सकाळ सत्रा मध्ये पाहुण्यांचे स्वागत स्वागतगीताने करण्यात आले त्यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यांनी प्रमुख

पाहुणे सौ.स्नेहा उकिरवे यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले व परीचय करुन दिला.

त्यानंतर विद्यार्थ्यानी .कु.देवेश देव्हारे रक्षाबंधन विषयी भाषणे केली,मितिन जोशी यांने संस्कृत कथा सादर केली, रक्षाबंधन गीत , सादर केले नंतर प्रमुख पाहुणे, मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना औपचारीक राखी बांधण्यात आली व प्रत्येकाना पेढा देऊन तोंड गोड करण्यात आले.

त्यानंतर कार्यकमांचे प्रमुख पाहुणे सौ. स्नेहा उकिरवे यांनी आपले विचार व्यक्त केले श्रावण महिना हा सणांचा राजा आहे अनेक सण या महिन्यात येतात त्यातील रक्षाबंधन हा सण पवित्र सण आहे.जो सबल आहे त्याच्या हातात राखी बांधून रक्षणांचे बंधन घालतो त्यामुळे प्रत्येकाने प्रत्येकाला सहकार्य करावे असे मौलीक विचार मांडले.

त्यानंतर विद्यार्थ्याना विद्यार्थिनीनी राखी बांधली व प्रत्येकाना पेढा देऊन तोंड गोड करण्यात आले.या कार्यकमांचे सूत्रसंचलन श्री.आयरे सर यांनी केले.तर आभार सौ.कोळपे मॅडम यांनी मानले.

दुपार सत्रात या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ.अकिता चव्हाण मॅडम गगनबावडा येथील सरपंच उपस्थित होत्या . प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यांनी पाहुण्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केल.नंतर उपमुख्याध्यापक सौ भिडे मॅडम यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करुन दिला.नंतर विद्यार्थ्याची भाषणे झाली त्यामध्ये कु.शिवानी महाडिक व विनीत कवळेकर यांनी रक्षाबंधन व संस्कृतदिन या विषयावर

विचार मांडले.यानंतर प्रतिनिधीक स्वरूपात प्रमुख पाहुणे ,सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थ्यांना राखी बांधण्यात आली

त्यानंतर संस्कृत दिन हा कार्यक्रम साजरा झाला यामध्ये विद्यार्थ्यांनी संस्कृत गीत,संवाद,कथा,स्तोत्र,संस्कृत गाण्यावर नृत्य सादर केले.इ.९ वी च्या विद्यार्थ्यांनी 'संस्कृतमय भवतू मम राष्ट्र 'हे गीत सादर केले नंतर कु.यश साळे याने एक संस्कृत कथा सादर केली इ.८ वी च्या विद्यार्थ्यांनी 'संस्कृताय जीवनम' इ.१० वी च्या विद्यार्थ्यांनी भवान्यष्टम'गीत सादर केले.त्यानंतर १० वी अ व ई मधील विद्यार्थ्यांनी आरोग्यावर आधारीत एक नाटीका सादर केली. इ.१० वी च्या विद्यार्थ्यांनी नृत्यगीत सादर केले.या सर्वातुन संस्कृत भाषेचे गोडवे व महत्व सांगितले यांना मार्गदर्शन संस्कृत शिक्षिका सौ.गुरव मॅडम यांनी मार्गदर्शन केले व विनित कवळेकर व तेजस तुपे यांनी सूत्रसंचलन केले.

त्यानंतर कार्यक्रमांच्या प्रमुख पाहुण्या सौ.चव्हाण मॅडम यांनी आपले विचार मांडले त्यावेळी त्यांनी संस्कृत भाषेचे महत्व खूप मोठे आहे.त्यामुळे संस्कृत भाषा अवगत केली पाहीजे असे सांगितले तसेच बहीण भावाचे नाते फार वेगळे आहे ते टिकवून ठेवले पाहीजे असे सुंदर विचार व्यक्त केले.तसेच शाळेला कधी ही सहकार्य करायला तयार आहे असे सांगितले व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर कार्यक्रमांचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.पोवार सर यांनी आपले विचार मांडले.त्यांनी या कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले ते म्हणाले बहीण भावाचे नाते हे अतुट असते ते जपले पाहीजे,तसेच संस्कृत भाषा ही सर्व भाष्यांची जननी आहे त्यामुळे संस्कृत भाषेचे संगोपन केले पाहीजे असे मौलिक विचार मांडले.

त्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यार्थिनींनी राखी बांधली व प्रत्येकाना पेढा देऊन तोंड गोड करण्यात आले.या कार्यक्रमांचे सूत्रसंचलन सौ.जाधव मॅडम यांनी केले.तर आभार सौ.कांबळे पी.एस.यांनी मानले.

# शिक्षक दिन अहवाल

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीची रा.भा.शिर्के प्रशाला येथे दि.११.९.१४ रोजी शिक्षक दिनांचे औचित्य साधून प्रशालेत स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला.

प्रशालेत प्रत्येक वर्षाच्या प्रथेप्रमाणे शिक्षक दिन हा स्वयंशासन दिन म्हणून साजरा केला जातो.यासाठी संपूर्ण शाळेचे कामकाज कसे चालते,शिक्षक शिकविण्याचा आनंद कसा असतो हे विद्यार्थी समजून घेतात.त्यासाठी इ.१० वी चे विद्यार्थी संपूर्ण एक दिवसाचे शाळेचे काम पहातात.यावेळी आजचे छात्र मुख्याध्यापक म्हणून कुमार विनित कवळेकर,उपमुख्याध्यापक कुमारी वैभवी पवार,पर्यवेक्षक कुमार वेदराज दामले व सेवक म्हणून कुमार सुयश सावंत तसेच इतर विद्यार्थ्यांनी शिक्षक,लिपीक म्हणून काम पाहीले

सकाळी७.३० वाजता शाळा भरल्यानंतर इ.५ वी ते १० वी विद्यार्थ्यांसमोर परिपाठ व प्रार्थना,राष्ट्रगीत सादर केले.त्यानंतर छात्रमुख्याध्यापक विनित कवळेकर याने छात्रशिक्षक व विद्यार्थ्यांना सुचना दिल्या व छात्र शिक्षकाच्या तासाला शिस्त ठेवा,शांततेचे सहकार्य करा असे आवाहन केले.

त्यानंतर १ ते ६ तास झाले पहिल्या तासापासून शेवटच्या तासापर्यंत प्रत्येक छात्र शिक्षकाने आपल्या वर्गावरचा पाठ घेतला व शिकविण्याचा पुरेपुर आनंद घेतला.कोणताही वर्ग रिकामा राहाणार नाही याची काळजी मुख्याध्यापक विनित कवळेकर व शिक्षकानी घेतली यांना विद्यार्थी वर्गाने चांगले सहकार्य केले.

या कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी यानी आवर्जुन भेट दिली यामध्ये संस्थेच्या कार्यवाह प्राची ताई जोशी ,स्कूल कमिटी अध्यक्ष ॲड.श्री.विजयराव साखळकर,संस्थेचे सहकार्यवाह श्री.नाना पाटील,सदस्य श्री मनोज पाटणकर,शिक्षक पालक संघ उपाध्यक्ष श्री.पर्शुराम निवेंडकर ,सचिव विशाखा लिमये,माजी शिक्षक श्री.वहाळकर,श्री.सोहनी,श्री.गीते,सौ.घैसास,श्रीमती पिलणकर,श्रीमती शिर्के,यानी भेट दिली व विद्यार्थ्याचे कौतुक केले,शुभेच्छा दिल्या.

यानंतर स्वयंशासन दिनाचा समारोप कार्यक्रम रंजनमंदिर सभागृहात पार पडला.आजचे छात्र मुख्याध्यापक विनित कवळेकर याने विचार मांडले व मुख्याध्यापक,शिक्षक व शाळेचे कामकाज कसे चालते याचा आम्हाला अनुभव आला,आनंदही भरपूर मिळाला पण हे काम करणे किती अवघड आहे याची जाणीव झाली असे सांगितले.

यानंतर काही विद्यार्थी व छात्र शिक्षक यानी आपले मनोगत व्यक्त केले.विद्यार्थीनी कु.प्राजक्ता वैद्य हिने आपले विचार मांडले आजचे छात्रशिक्षकांनी शिक्षकांची भूमिका उत्तमरित्या पार पाडली आम्हाला खूप मजा आली असे सांगितले छात्रशिक्षक कु.गुरुप्रसाद दामले ,कु.शिधये,कु.सरदेसाई,सेवक सुयश सावंत यानीही आपले मनोगत व्यक्त केले.त्यासर्वानीच शिक्षक म्हणून काम करताना आनंद तर मिळतोच पण विद्यार्थी दंगा मस्ती करतात त्यांना शांत करण्यात कशी कसरत करावी लागते हे आज कळले नंतर अभिप्राय वाचन झाले.

यानंतर प्रशालेचे पर्यवेक्ष श्री.सी.एस.पाटील यांनी आपले विचार व्याक्त केले नरेंद्र मोदीचा उल्लेख करुन आजचा विद्यार्थी व शिक्षणाबदद्लचा विचार मांडला.कोणतेही काम ,कोणताही पेशा असो प्रामाणिकपणे काम करा असा संदेश दिला.सर्वच वर्गात संपूर्ण शांतता होती व प्रत्येक विद्यार्थी मनापासून शिकविण्याचे काम केले याबध्दल सर्वच छात्रशिक्षकाना धन्यवाद दिले.

यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.बी.डी.पोवार यांनी आपले अध्यक्षीय भाषण केले त्यावेळी त्यांनी छात्रशिक्षक,छात्रमुख्याध्यापक,पर्यवेक्षक,सेवक यांचे मनापासून कौतुक केले.शाळेचे कामकाज आज तुम्ही पाहीलेत त्यावेळी अनेक अडचणी,समस्या कशा असतात हे तुम्ही समजून घेतलात आज अनेक संस्थेच्या पदाधिका-यानी भेट दिली व तुमचे वर्गावर्गातुन काम पाहिले आज सगळे वर्गशांत आहेत असे उदगार काढले यावरुन तुम्ही चांगले नियोजन केले होतात,तुमचे काम चांगले होते,तुम्ही मनापासून अजचे कामकाज पाहिलेत म्हणून सर्वाना धन्यवाद दिले.तसेच छात्रसेवक सुयश सावंत यांचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमांचे सूत्रसंचलन उत्कर्षा भूते व आभार छात्र उपमुख्याध्यापीका कु.वैभवी पवार हिने मानले.

## अहवाल

## □ मित्र उपक्रमांतर्गत आनापान प्रशिक्षण वर्ग□ उत्साहात संपन्न

**दि. २०/८/१४**

रत्नागिरी २०/८/१४ -शहरातील रा.भा.शिर्के प्रशाला येथे राज्य शासनाच्या मित्र उपक्रमांतर्गत आनापान प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबिर प्रशालेतर्फे शिक्षकांसाठी आयोजित करण्यांत आले होते.या प्रशिक्षणात सर्व शिक्षक व पालक प्रतिनिधीनी सहभाग घेतला.

भारताच्या प्राचीन परंपरेत घरोघरी प्रचलित असलेली आनापान विद्या आता पुनश्च घरोघरी शुद्ध स्वरुपात पोहचण्याची आवश्यकता असून प्रत्येक भारतीयाने त्याचा अंगिकार करुन आदर्श भारत

घडविण्यासाठी प्रयत्नशील राहूया असे मत जि.प.मित्र उपक्रमचे जिल्हा समन्वयक श्री.संतोष आयरे यांनी मार्गदर्शन करताना व्यक्त केले.भारताला विद्वान ऋषी-मुनींची परंपरा असून आपण त्यांच्याकडे शास्त्रज्ञांच्या दृष्टीने पाहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

मित्र (माइन्ड इन ट्रेनिंग फॉर राईट अवेअरनेस )उपक्रमांतर्गत करण्यांत येणारी आनापान साधना शुद्ध आणि सहज श्वासावर आधारलेली वैज्ञानिक पद्धती असून दररोजच्या ताणतणावातून मुक्त करुन कार्यक्षमता वाढविण्यासाठी अतिशय उपयुक्त असल्याचे श्री.आयरे यांनी याप्रसंगी नमूद केले.

विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती,आकलनशक्ती आणि प्रकटीकरणशक्ती वाढविण्याबरोबरच रोगप्रतिकारक शक्ती वाढवून रोगाचे समूळ उच्चाटन करण्याची क्षमता या साधनेत आहे.पंचशीलाचे आचरण करुन नियमित आनापान सराव केल्याने आपण भारताची भावी पिढी निरोगी आणि बुद्धीमान अशी निर्माण करु शकू असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. मात्र यासाठी शिक्षक व पालकांनी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे.उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आणि वस्तूनिष्ठ मूल्यमापनासाठी उपक्रम अंमलबजावणी आधी विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरुन घ्यावी असेही त्यांनी सुचविले. मार्गदर्शन सत्राच्या शेवटी त्यांनी मंगल मैत्री भावना दिली.

याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.बी.डी.पोवार यांनी प्रास्ताविक तर आभार प्रदर्शन प्रशालेचे पर्यवेक्षक श्री.सी.एस.पाटील यांनी केले.प्रशिक्षणा दरम्यान पालक प्रतिनिधी म्हणून श्री.प्रभाकर वि.निमकर आणि सौ.सुलक्षणा सावंत उपस्थित होते.सदरच्या तीन तासांच्या प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापिका सौ.भिडे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.